महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ६६३६ दि.- २६/१२/२०२३

## अपिलाची सुनावणी

(अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – ०७ / १२ /२०२३ दिनांक – दुपारी ४.१५ वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

प्रति,

**श्री सुरेश जनार्दन गायकवाड**
**शिवनेरी नगर गल्ली क्र. ३६ प्रगती निवास,**
**कोंढवा खुर्द, पुणे – ४११०४८** } अपिलार्थी

श्री. गणेश तारू
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक

**<u>माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल</u>**

श्री मनोज क्षीरसागर यांचा माहिती अधिकारातील दिनांक (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) १६ /११ /२०२३ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.७९४९ दि.१६ /११ /२०२३ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

**माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील**

| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| १७ /१० /२०२३ | आ क्र ७००१ १७ /१० /२०२३ | १६ /११ /२०२३ | जा क्र ५५०१ ०८ /११ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली माहिती अपीलार्थी यांना समाधान न झाल्यामुळे त्यांचा अपिल अर्ज दिनांक ३० /११ /२०२३ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

**अपिल अर्जाचा तपशील**

| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १६ /११ /२०२३ | १६ /११ /२०२३ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. ०७ /१२ /२०२३ रोजी दुपारी ४.१५ वा.
सुनावणीस अपिलकर्ता - अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –

| अ.क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | दिनांक १२/१०/२०२३ रोजी दुपारी ठीक २.०० वा. गांधी एम्पायर समोर झालेल्या कारवाईच्या आदेशाची अभिलेखच्या कागदपत्रांची छायाकिंत प्रती माहिती अधिकार चिन्हासह मिळाव्यात. | आपण सादर केलेल्या माहिती अधिकार अर्जामधील नमूद दि.१२/१०/२०२३ रोजी गांधी एम्पायर समोर अतिक्रमण विभाग बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडून अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई केली नाही. त्यामुळे कारवाई केलेबाबतची नोंद दस्तऐवज आढळून येत नाही. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०७/१२/२०२३रोजी दुपारी ४.१५वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री सुरेश गायकवाड हे अनुपस्थित होते. सदर दिनांकास श्री गणेश तारू जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्री महेश मारणे सहा जन माहिती तथा अतिक्रमण निरीक्षक उपस्थित होते.

अपिलार्थी श्री सुरेश गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना समाधान न झाल्यामुळे अपिल अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'</u>

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध अभिलेख दाखवून त्यानुसार त्यांना उपलब्ध असलेली आवश्यक माहिती विनामुल्य देण्यात यावी. सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश पवार )
**अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्याल
पुणे महानगपालिका

<u>टिप –</u>

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.orgया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

३. श्री गणेश तारू ,जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक,बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका

४ श्री महेश मारणे सहा जनमाहिती अधिकारी तथा अतिक्रमण निरीक्षक बिबवेवाडी कार्यालय,पुणे महनगरपालिका